# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 July 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ जूलै २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी–देशभरात १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये पुढची सहा वर्षं योजनेची अंमलबजावणी
- सौर ऊर्जेबाबतच्या अडचणी समजून घेत प्राधान्याने उपाय शोधले जात असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- विधान परिषदेतील कार्यकाळ पूर्ततेबद्दल विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना निरोप
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं निधन

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथं एक विद्यार्थी एक वृक्ष तथा एक पेड माँ के नाम उपक्रमाला शुभारंभ

****

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. पुढची सहा वर्षं देशातल्या १०० आकांक्षित जिल्ह्यांमधे ही योजना राबवण्यात येईल. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत याबाबत अधिक माहिती दिली. ते म्हणाले –

**बाईट – अश्विनी वैष्णव, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री**

****

शेतकऱ्यांना सौर वीज घेण्याची सक्ती नाही मात्र, सौर ऊर्जेबाबतच्या अडचणी समजून घेऊन त्यावर प्राधान्याने उपाय शोधले जात असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आज विधान परिषदेत अभिजीत वंजारी यांच्या

प्रश्नाला ते उत्तर देत होते. पूर्वीच्या सोलर बूस्टर पंपापेक्षा, आता दिले जाणारे पंप अधिक सक्षम आहेत, तरीही एखाद्या ठिकाणी अडचणी असल्या तर तिथल्या शेतकऱ्यांना, सौर ऊर्जे ऐवजी पारंपरिक वीज देण्याचा विचार करु, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

ऑपरेशन मुस्कानअंतर्गत आत्तापर्यंत ४१ हजार १९३ लहान मुलांचा तपास लागला असून ऑपरेशन शोधअंतर्गत गेल्या वर्षी १७ एप्रिल ते १५ मार्च या कालावधीत ४ हजार ९६० महिला सापडल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेत दिली. आमदार सुनील शिंदे यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

राज्यातील सर्व औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्र–एमआयडीसीकडील मोकळ्या जागेचा वापर वाहनतळासाठी केला जाईल, तसंच भविष्यातील तरतूद म्हणून बहुमजली वाहनतळ सुविधा निर्माण करण्याबाबत विचार करण्यात येईल, असं मुख्यमंत्र्यांनी विधान परिषदेत सांगितलं. सदस्य विक्रांत पाटील यांच्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

****

राज्यातील विविध विभागात लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीच्या फुटेजसंदर्भात आदर्श कार्यप्रणाली तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाला दिले आहेत. गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत ही माहिती दिली. खासगी आस्थापनांमधील सीसीटीव्हीचं फुटेज बाहेर दिलं जाऊ नये, याबाबत पुढील अधिवेशनापूर्वी धोरण तयार केले जाईल, असं भोयर यांनी सांगितलं.

****

विधानसभेत आज शिक्षण तसंच शेतकरी सुरक्षा विषयावर चर्चा झाली. खासगी शिकवणी वर्गांशी संधान साधणाऱ्या महाविद्यालयांवर बंदीसाठी नवीन कायदा लवकरच केला जाणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितलं. अतिरिक्त शुल्क आणि शालेय साहित्य खरेदीच्या सक्तीविरोधातही नियम केले जाणार असल्याची माहिती भुसे यांनी दिली.

शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांकडून हडप करण्याची प्रकरणं जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तपासली जाणार असल्याचं सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितलं, आतापर्यंत शेतकऱ्यांच्या १० हजार तक्रारींमध्ये ८७१ हेक्टर जमिनी वाचवण्यात यश आलं असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

****

परभणी जिल्ह्यात ऑनलाईन सट्टा-जुगार वाढत असल्याबद्दल आमदार रत्नाकर गुट्टे यांनी विधानसभेत चिंता व्यक्त केली. या प्रवृत्तीला रोखण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची गरज गुट्टे यांनी व्यक्त केली.

****

महाराष्ट्र-तेलंगणा सीमावादात अडकलेली १४ मराठी गावं लवकरच महाराष्ट्रात समाविष्ट होणार आहेत. यावर अंतिम निर्णय लवकरच घेण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

****

शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेची युती झाली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी आज मुंबईत संयुक्त पत्रकार परिषदेत या युतीची घोषणा केली. वार्ताहरांशी संवाद साधतांना शिंदे यांनी युतीमागची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले –

**बाईट – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

कोणत्याही अटी शर्तींशिवाय ही युती होत असून आंबेडकरी कार्यकर्त्यांना सत्तेत सामावून घ्यावं, अशी विनंती आपण उपमुख्यमंत्री शिंदे यांना केल्याचं आनंदराज आंबेडकर यांनी यावेळी सांगितलं.

****

नीती आयोगाच्या 'विकसित महाराष्ट्र-२०४७' उपक्रमाच्या अनुषंगाने दिव्यांग कल्याण विभागाचा सर्वांगीण आणि दीर्घकालीन विकास आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन केली आहे. यासंदर्भातला शासन निर्णय जारी करण्यात आला. या समितीत लातूरच्या डॉ.प्रिती पोहेकर यांचा समावेश करण्यात आला आहे.

****

संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी केंद्रसरकारने येत्या रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारी, २१ जुलैपासून सुरु होणार असून ते येत्या २१ ऑगस्टपर्यंत चालणार आहे.

****

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा विधान परिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ पुढच्या महिन्यात पूर्ण होत आहे. त्यांना आज सदनात निरोप देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक सदस्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

****

लोकमान्य टिळकांचे पणतू, 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं, ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. समाजाच्या सर्व स्तरातली अनेक मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून टिळक यांना श्रद्धांजली अर्पण केली. टिळक यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज "एक विद्यार्थी एक वृक्ष" तथा 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाचा शुभारंभ आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते झाला. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेत झालेल्या या कार्यक्रमाला कार्यक्रमाला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, विभागीय शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षकांनी आपल्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांला एक झाड लावण्यासाठी प्रोत्साहित करण्याचं आवाहन पापळकर यांनी यावेळी केलं. जिल्ह्यातील १० लाख विद्यार्थी या अभियानामध्ये सहभागी होत असल्याचं जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितलं.

****

मीडिएशन फॉर द नेशन या विशेष मोहिमेअंतर्गत देशभरात ९० दिवसांची राष्ट्रीय मध्यस्थता विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. यामध्ये प्रलंबित आणि दाखल प्रकरणं सामोपचाराने सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्देशानुसार ही मोहीम औरंगाबाद विभागातही राबवली जाणार आहे. पक्षकारांनी आपल्या वकिलांमार्फत किंवा थेट मध्यस्थता केंद्राशी संपर्क करून प्रकरणे सामोपचारातून मिटवण्यासाठी अर्ज करण्याचं आवाहन, उच्च न्यायालय विधी उप सेवा समितीचे अध्यक्ष, न्यायमूर्ती रविंद्र घुगे यांनी केलं आहे.

****

जपानच्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विक साईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी तर एकेरी गटात लक्ष्य सेनने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दोन वेळा ऑलिम्पिक पदक मिळवलेल्या पीव्ही सिंधूचा मात्र पराभव झाला.

****

भारत आणि इंग्लंडदरम्यान तीन एकदिवसीय महिला क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना साऊथॅम्पटन इथं सुरू आहे. इंग्लंडच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली, शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडनं दोन बाद २८ धावा केल्या होत्या.

****

हवामान

विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांना पुढचे तीन दिवस यलो अलर्ट देण्यात आला असून, मुंबई शहर आणि उपनगरात पुढच्या २४ तासांत हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणाची पाणी पातळी सध्या ७८ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

****